# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


**<u>प्रेसनोट क्र.२१ दिनांक ०२/०३/२०२१</u>**

## कासा पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थाची वाहतुक करणा-या आरोपीतास अटक

दिनांक ०१/०३/२०२१ रोजी ०१.१५ वा.चे सुमारास कासा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे चारोटी टोल नाका येथे संशयीत वाहनांची तपासणी करत होते. तपासणी दरम्यान हयुंडाई एक्सेंट कार. एम. एच. ०२ ई.एफ ३९२७ कारमध्ये प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थांचा माल वाहनामध्ये मिळुन आला. सदरचा माल हा मानवी आरोग्यास अपायकारक आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला आहे. हे माहीत असतानाही शासकीय आदेशाची अवहेलना करुन विक्री करण्यासाठी वाहतुक करुन घेवुन जात असताना मिळून आले. यामध्ये एकुण दोन आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

आरोपीत याचे ताब्यातुन १) ६०,९८४/- रु की. विमल पान मसाल्याचे ३०८ पॅकेट, प्रत्येकी पॅकेट १९८ रु. २)६,७७६/-रु. की, व्ही-१ टोबॅको चे ३०८ पॅकेट, प्रत्येकी पॅकेट २२ रु .प्रमाणे ३) ६,५०,०००/- रु. की. एक सफेद रंगाची हयुंडाई एक्सेंट कंपनीची कार. एम. एच. ०२ ई.एफ ३९२७ असा एकुण ७,१७,७६० /- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीत याचे विरुध्द कासा पोलीस ठाणे गु.र.नं. I ४५/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३२८, १८८, २७२, २७३, सह अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, नियम व नियमने २०११ चे कलम २६ (२) कलम २७, कलम २३, तसेच कलम २६ (2) (iv) सहवाचन कलम 30 (2) (a) सहवाचन Regulation No. 2.3.4 of Food Safety & Standards (Prohibition and Restrictions on Sales) Regulations 2011, सहवाचन Regulation No. 3.1.7 of Food Safety & Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations 2011, शिक्षा कलम ५९ प्रमाणे, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यास दिनांक ०१/०३/२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास पोउपनिरीक्षक/एच.ए.सरगर, हे करित आहेत.

सदरची कारवाई सपोनि/उमेश पाटील, प्रभारी अधिकारी, कासा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली कासा पोलीस ठाणे नेमणुकीतील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांनी केली आहे.

Scanned with CamScanner